# मुंबई विद्यापीठ

प्रति,
मा. प्रा. बी.एस. बिडवे,
राष्ट्रीय सेवा योजना,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

PRO/IUD/16-17/135

मुंबई विद्यापीठ
दिनांक –१०/०२/२०१६

**विषय-** २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यासाठीचे कार्यालयीन आदेश

**संदर्भ-** १) शासन परिपत्रक क्रमांक- बैठक -२४१३ (प्र.क्र.०४/१७/समन्वय, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२,तारीख २० जानेवारी, २०१७

२) सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्रमांक – क्र. ससं/उशि/मुंवि/मराठी भाषा गौरव दिन/२०१७/३१९
३) 'महाराष्ट्राची सांस्कृतिक गंगा' या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी अशोक हांडे, चौरंग संस्था, मुंबई यांचे मा. कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांना लिहलेले पत्र.

**महोदय,**

वरील संदर्भाधीन शासन परिपत्रक आणि संहसंचालक कार्यालयाचे मुंबई विद्यापीठास प्राप्त झालेले पत्र, 'महाराष्ट्राची सांस्कृतिक गंगा' या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी अशोक हांडे, चौरंग संस्था, मुंबई यांचे मा. कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांना सादर केलेला प्रस्ताव, तसेच दिनांक ४ फेब्रुवारी २०१७ रोजी, मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांची, कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी सर्व विद्यापीठे यांच्या बैठकीत ठरलेल्या बाबींच्या अनुषंगाने आपणास विदितच आहे की, श्री.वि.वा शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी, हा जन्मदिन **'मराठी भाषा गौरव दिन'** म्हणून साजरा करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आपल्यावर खालील जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

१) राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने मराठी विकिपीडियावर मराठीतून लिखान करण्यास विद्यार्थ्यांस प्रोत्साहन देणे.

२) अधिकाअधिक पृष्ठे मराठी विकिपीडियावर तयार केली जाणार यासाठी संलग्नित महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांपर्यंत ही संकल्पना पोहचविणे.

३) शासन परिपत्रक व संबंधित उपक्रम सूची प्रत्येक महाविद्यालयापर्यंत पोहचविणे आवश्यक

४) सर्व प्रकारच्या महाविद्यालयांमध्ये, सर्व विभागांच्या सहभागातून कार्यक्रम होतील, याबाबत पाठपुरावा करणे.

५) मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रनिहाय / जिल्हानिहाय एका मोठ्या महाविद्यालयात अशा कार्यक्रमाचे आयोजन करून तो कार्यक्रम संपूर्ण जिल्ह्याचा कार्यक्रम असेल अशा पद्धतीने कार्यक्रम साजरा करण्यात यावा.

६) प्रत्येक जिल्हानिहाय आणि महाविद्यालयात कशा व कोणत्या पद्धतीने कार्यक्रम साजरा करण्यात आला त्याअनुंषगाने कार्यक्रमाचा अहवाल कुलसचिव कार्यालयास सादर करणे.

७) शासन परिपत्रक क्रमांक- बैठक -२४१३ (प्र.क्र.०४/१७/समन्वय, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०००३२, तारीख २० जानेवारी, २०१७, मध्ये नमुद केलेल्या मुद्दयांनुसार जबाबदारी पार पाडणे.

८) या व्यतिरिक्त तदअनुषंगिक उद्भवणाऱ्या किंवा आयत्या वेळी हाती येणाऱ्या विषयांनुसार जबाबदारी पार पडणे.

डॉ. एम. ए. खान

१/२/१७

**कुलसचिव**